जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १००          दिनांक - ११/०२/२०२५**

खंडणी विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर

## सराईत गुन्हेगारांकडून २ पिस्टल व ३ जिवंत काडतुसे केली जप्त

दि.१०/०२/२०२५ रोजी खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे पेट्रोलिंग करीत असताना **पोलीस अंमलदार प्रफुल्ल चव्हाण व अमर पवार** यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम एनडीए - खडकवासला रोड, कोंढवे धावडे, पुणे येथे पिस्टल बाळगून थांबला असल्याची माहिती मिळाली.

त्यावरून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तेथे जाऊन सापळा रचून बातमीप्रमाणे एक इसम व त्याचा आणखी एक साथीदार यांना ताब्यात घेवून त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्याची नावे **१) अनिकेत विनायक जाधव, वय २४ वर्षे, रा. धायरी गारमळा, खंडोबा मंदिराजवळ पुणे २) गणेश तानाजी किवळे, वय २३ वर्षे, रा. सिंहगड किरकीटवाडी रोड, नांदोशी, पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता अनिकेत विनायक जाधव याच्या कंबरेला १ देशी बनावटीचे पिस्टल, १ जिवंत काडतुस व गणेश तानाजी किवळे याच्या कंबरेला १ देशी बनावटीचे पिस्टल, २ जिवंत काडतुस असा एकूण ४५,६००/- रू कि.चा मुद्देमाल मिळून आल्याने सदर आरोपी विरूद्ध उत्तमनगर पो स्टे गु.र.नं. १७/२०२५ आर्म ॲक्ट ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदरचे दोन्ही आरोपीं हे सिंहगड रोड पो.ठाणे कडील रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.पुढील तपास सपोनि राजेश माळेगावे, खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करत आहेत.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे,) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त आर्थिक व सायबर (अतिरिक्त कार्यभार गुन्हे)श्री,विवेक मासाळ, मा. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १, श्री. गणेश इंगळे, यांच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार खंडणी विरोधी पथक १, चे पोलीस निरीक्षक श्री.विजय कुंभार, सहा.पोलीस निरीक्षक राजेश माळेगावे,पोलीस अंमलदार प्रफुल्ल चव्हाण,दुर्योधन गुरव,राजेंद्र लांडगे, सयाजी चव्हाण, मयुर भोकरे, अमोल आवाड, नितीन कांबळे, रविंद्र फुलपगारे, प्रविण ढमाळ, अमर पवार यांनी केली.